**पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग**
ओरोस, ता. कुडाळ, जि.सिंधुदुर्ग ४१६८१२
ई मेल- sp.sindhudurg@mahapolice.gov.in
दुरध्वनी क्र. ०२३६२ - २२८२०१

जा.क्र. - ८/आशा/पोलीस भरती/ ४९८२ /२०२४ **प्रेस नोट** दिनांक :- ०८/०७/२०२४

---

सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर सन २०२२-२३ मध्ये रिक्त असलेल्या २४ चालक पोलीस शिपाई पदाकरीता मैदानी चाचणी दि.२९/०६/२०२४ ते ०२/०७/२०२४ या कालावधीत घेण्यात आलेली होती. मैदानी चाचणीमधून कौशल्य चाचणीसाठी पात्र ठरलेल्या एकूण ४५० उमेदवारांना सदर चाचणी करीता दि.०७/०७/२०२४ ते दि.०९/०७/२०२४ या कालावधीत टप्प्याटप्प्याने बोलाविण्यात आलेले होते.

दि.०७/०७/२०२४ व दि. ०८/०७/२०२४ रोजी पावसाच्या व्यत्ययामुळे बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांची कौशल्य चाचणी घेणे शक्य झाले नसल्याने आजची पोलीस शिपाई पदाची कौशल्य चाचणी रद्द करुन त्यांना पावसाचे वातावरण पाहून पुढील तारीख देण्यात येणार असल्याची सुचना देण्यात आली. तसेच, हवामान खात्याने दिलेल्या अतिवृष्टीचा इशारा विचारात घेऊन उदया दि.०९/०७/२०२४ रोजी बोलाविण्यात आलेल्या १७० उमेदवारांची कौशल्य चाचणी रद्द करण्यात आलेली असून सदर उमेदवारांना पुढील तारीख कळविण्यात येणार आहे. तशा सुचना उमेदवारांना एसएमएस द्वारे व सिंधुदुर्ग पोलीस दलाच्या संकेतस्थळाव्दारे कळविण्यात आलेले आहे. तरी सर्व संबंधित उमेदवारांनी कौशल्य चाचणीच्या दिनांकाबाबत सिंधुदुर्ग पोलीस दलाच्या संकेतस्थळाला वेळोवेळी भेट देवून माहिती घ्यावी. कोणही उमेदवार कौशल्य चाचणी घेण्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे. कौशल्य चाचणीबाबत कोणत्याही उमेदवारास शंका असल्यास त्यांनी पोलीस नियंत्रण कक्ष, सिंधुदुर्ग येथील मोबाईल क्र. ८२७५७७६२१३ किंवा sp.sindhudurg@mahapolice.gov.in या ई मेल वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

टिप :- **दि. ०९/०७/२०२४ रोजी बॅन्डसमन पोलीस शिपाई पदाची कौशल्य चाचणी नियोजित वेळापत्रकाप्रमाणे होणार असल्याने सदर कौशल्य चाचणीसाठी येणाऱ्या सर्व उमेदवारांनी वेळेत उपस्थित रहावे.**

**( सौरभ कुमार अग्रवाल )**
पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग

प्रति,
**जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग**